# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **WashimCity**

**Date of Good Work done** :- **22/08/2022**

**Brief of the work done :-**

दिव्यांग व्यक्तीचा मोबाईल चोरट्यास 02 तासांत अटक ; पो.स्टे.वाशीम शहर पोलिसांची कारवाई.

## दिव्यांग युवकाचा हरविलेला मोबाईल दोन तासात शोधला

### वाशिम पोलीसांची कौतुकास्पद कामगिरी

देशोन्नती वृत्तसंकलन...



**वाशिम** ■ एका दिव्यांग व्यक्तीचा कार्यक्रमात हरविलेला महागडा मोबाईलचा पोलीसांनी दोन तासात तपास लावून तो मोबाईल संबंधीतांच्या ताब्यात दिल्याची घटना १९ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी तपासाची चक्रे वेगाने फिरवून तक्रारकर्त्याला दिलासा मिळाला असून, वाशिम पोलीसांच्या या कौतुकास्पद कामगिरीची सर्वत्र चर्चा होत आहे.

या प्रकरणाची माहिती अशी की, हर्षवर्धन भालेराव रा. गोरेगाव या दिव्यांग युवकाने स्थानिक स्वागत लॉन येथे किशोर का कॉंरवा कार्यक्रमात सहभाग घेतला होता. कार्यक्रमा दरम्यान गर्दीचा फायदा घेवून चोरट्याने आपला मोबाईल लंपास केल्याचे कळताच या युवकाने स्थानिक शहर पोलीसात धाव घेतली. पोलीस स्टेशनमध्ये कर्तव्यावर उपस्थित असलेले पोलीस कॉन्स्टेबल श्रीहरी चिकटे यांनी त्या युवकाची तक्रार समजून घेतली. यानंतर त्यांनी पोलीस निरिक्षक रफीक शेख, एपीआय गाठे यांच्या मार्गदर्शनात वाहनचालक पो.कॉ. निंबाळकर, होमगार्ड संभाजी काळे यांच्यासह मोबाईल चोरी प्रकरणातील संशयीतांचा तपास घेतला.

दरम्यान मोबाईल चोरट्याने सदर मोबाईल दुसऱ्या व्यक्तीस दिला अशी माहिती मिळताच त्यांनी त्या व्यक्तीचा शोध घेतला व चोरीस गेलेला मोबाईल अवघ्या दोन तासात भालेराव यांच्या ताब्यात दिला. दोन तासाआधी हरविलेला मोबाईल परत मिळण्याची आशा गमावून बसलेल्या भालेराव यांना दोन तासातच मोबाईल परत मिळाल्यामुळे त्यांनी पोलीस निरिक्षक रफीक शेख, एपीआय गाठे यांच्यासह कर्तव्यतत्परतेने मोबाईलचा तपास लावणारे पो.कॉ. श्रीहरी चिकटे, पो.कॉ. निंबाळकर, होमगार्ड संभाजी काळे यांचे आभार मानले.